पुढारी | शुक्रवार
७ ऑगस्ट २०१५



दोडामार्ग : विद्यार्थ्यांना मार्गदर्शन करताना डॉ. संजय देशमुख.
(छाया : रत्नदीप गवस)

# मुंबई विद्यापीठाच्या कुलगुरूंची दोडामार्ग महाविद्यालयाला भेट

दोडामार्ग (प्रतिनिधी) : शिक्षणाकडे ज्ञानार्जनाचे आणि अर्थार्जनाचे साधन म्हणून न पाहता त्यापलिकडे जावून समाजासाठी आपल्याला काहीतरी करता येईल का याचा विचार केला पाहिजे, असे प्रतिपादन मुंबई विद्यापीठाचे कुलगुरू डॉ. संजय देशमुख यांनी केले. मुंबई विद्यापीठाच्या कुलगुरूपदाचापदभारस्वीकारल्यानंतर प्रथमच त्यांनी दोडामार्ग येथील लक्ष्मीबाई हळबे महाविद्यालयाला भेट देवून विद्यार्थ्यांना मार्गदर्शन केले. नवनिर्माण शिक्षण संस्थेचे अध्यक्ष अभिजित हेगशेटये, मोहन खातू, भाई परमेकर, प्राचार्य व्ही. ए. पाटील, विवेकानंद नाईक, बाबुराव धुरी उपस्थित होते. डॉ. देशमुख म्हणाले, शिक्षणाची धुरा सांभाळत इथला विकास कसा साधता येईल हे येथील मातीतल्या माणसालाच समजते.